# मिरा भाईंदर महानगरपालिका

**अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.ठाणे-४०११०१ दुरध्वनी क्रं.२८१९२८२८


2021-22 Majhi Vasundhara2

**जा.क्र.मनपा/अवि/ ४५८ /2025-26** दि. १८ / ८ / २०२५

## <u>सुधारित आदेश</u>

विषय :- सन 2025-26 मध्ये सार्वजनिक श्री गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर उत्सवाकरिता रस्त्यावर/ पदपथावर/ पादचारी मार्गावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- 1) इकडील आदेश जा.क्र.मनपा/अवि/447/2025-26 दि.01/08/2025

2) महाराष्ट्र शासन, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: याचिका-2024/प्र.क्र./तां.क.3 दि.01/08/2025

राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात सार्वजनिक उत्सव/ सण/ कार्यक्रमाच्या वेळी रस्त्यावर/ पदपथावर/ पादचारी मार्गावर तात्पुरता मंडप बांधण्या/ उभारण्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्र.173/210 श्री महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 10/08/2016, दि.08/02/2018 व दि.25/04/2019 रोजी ओदश दिलेले आहेत. तसेच मा. विशेष महासभा, दि.22/07/2015 ठराव क्र. 38 अन्वये याबाबत धोरण निश्चित केलेले आहे. त्यानुसार संदर्भ क्र.1 च्या आदेशान्वये सन 2025-26 या वर्षा मध्ये सार्वजनिक श्री गणेशोत्सव, नवरात्रौत्सव व इतर उत्सवा करिता रस्त्यावर/ पदपथावर/ पादचारी मार्गावर तात्पुरत्या स्वरुपात मंडप परवानगी देण्याची व इतर कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

तथापि महाराष्ट्र शासन, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांक: याचिका-2024/प्र.क्र./तां.क.3 दि.01/08/2025 अन्वये पर्यावरण पूरक सण साजरे करण्याच्या अनुषंगाने मूर्ती विसर्जनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने संदर्भ क्र.1 च्या आदेशमधील <u>अनु. क्र. 23 मध्ये</u> खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

23) मा. उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र.96/2024 मधील दिनांक 09.06.2025 रोजीचे अंतरिम आदेश व दि.24/07/2025 रोच्या आदेशानुसार <u>"6 फुटापेक्षा कमी उंचीच्या प्लास्टर ऑफ पॅरिस (POP) च्या मूर्तींचे विसर्जन हे कुत्रिम तलावामध्येच करणे बंधनकारक आहे."</u> असे निर्देश देण्यात आले होते. याऐवजी पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**<u>"मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात 6 फूट उंची पेक्षा कमी उंचीच्या सर्व मूर्त्यांचे विसर्जन हे कृत्रिम तलावातच केले जाईल याबाबत आवश्यक ती खबरदारी घ्यावी</u>," असे निर्देश देण्यात येत आहे."**

(राधाबिनोद अ. शर्मा, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1) सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी,
   प्रभाग समिती क्र. 01, 02, 03, 04, 05 व 06
2) कार्यकारी अभियंता,
   विद्युत विभाग,
   मिरा भाईंदर महानगरपालिका.
3) प्रभारी मुख्य अग्निशमन अधिकारी
   मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव :-

1) पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
   मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
2) शहर अभियंता, मिरा भाईंदर महानगरपालिका
3) अग्निशमन विभाग,
4) माहिती व तंत्रज्ञान विभाग,
5) माहिती जनसंपर्क विभाग,
6) सर्व स्थानिक पोलीस ठाणे, मिरा भाईंदर शहर
7) वाहतूक पोलीस ठाणे, काशिमिरा